*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – III* *ISSN 2277-8063*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महाराजा सयाजीराव गायकवाड

**शितल अशोक गायकवाड,** संशोधक विध्यार्थीनी, डो. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर,

९४२०८८३८६७ snmalegaonkar@gmail.com

---

**सारांश**

शिक्षण हा समाजाच्या उद्धाराचा एकमेव मार्ग असल्याचे गुपित बाबासाहेबांना ज्ञात होते, परंतु तत्कालीन समाज व्यवस्थेत जातीच्या जुलमी उतरंडी बरोबरच व्यक्तीचा आर्थिक स्तर किंवा दर्जाही उतरता होता. तथाकथित समाजात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातप्रवर्गात भीमरावांचा जन्म झाला होता. मुळातच बुद्धीने चाणाक्ष असणाऱ्या भीमरावांनी मॅट्रिक परीक्षेत उत्कृष्ट गुण घेऊन उत्तीर्ण झाले असले तरी, लष्करी सेवेतून निवृत्त झालेल्या त्यांच्या वडिलांना मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्ती वेतनावर त्यांच्या शिक्षणाचा आर्थिक भार पेलण्यासारखा नव्हता. यावेळी द. सा. यंदे व कृष्णराव केळुस्कर यांनी बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची भेट भीमरावांसोबत घालून दिली.

बडोदा संस्थानचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे बाबासाहेबांच्या शिक्षणाच्या बाबतीतल्या असणाऱ्या धोरणांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक जीवनाला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. बाबासाहेबांच्या शैक्षणिक प्रगतीचा चढता आलेख हा सयाजीरावांच्या मनाला संपूर्ण समाधान देणारा होता. मॅट्रिक नंतरची चार वर्ष पदवी पूर्ण केल्यानंतर बाबासाहेब बडोद्यास नोकरीसाठी गेल्यानंतर सहकाऱ्यांची जात सूचक वागणूक त्यांना त्रासदायक ठरली. दरम्यानच्या काळात वडिलांचे छत्र हरवल्यामुळे मुंबईत आलेल्या बाबासाहेबांना पुन्हा बडोद्यास नोकरीसाठी जाणे उद्विग्न करणारे होते. याच वेळी मुंबईत आलेल्या सयाजीरावांना भेटण्यास व अडचणी सांगण्यास गेलेल्या बाबासाहेबांना परदेशात शिकण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जात असल्याची वार्ता सयाजीरावांनी बाबासाहेबांना सांगितली. संबंधित शिष्यवृत्तीच्या अर्जाच्या संदर्भाने आलेल्या अडचणींना महाराजांनी स्वतः व्यक्तिशः लक्ष देऊन त्याची पूर्तता केली. परदेशात शिकत असताना सयाजीरावांनी बाबासाहेबांना दोन वेळा शिष्यवृत्ती वाढवून दिली. नंतर पुन्हा शिष्यवृत्ती वाढवून देण्याची मागणी सरकारी नियमांच्या अडचणीमुळे पूर्ण करता देता आली नाही व बाबासाहेबांना मुंबईत परतावे लागले.

एकंदरच बाबासाहेबांच्या एकूण शैक्षणिक कारकिर्दीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा खूप मोठा आर्थिक हातभार होता. बाबासाहेबांना पदवीसाठी चार वर्ष, एमए साठी तीन वर्ष, पदव्यूत्तर एक वर्ष वाढवून, पुन्हा एक वर्ष अशा चार वेळेस, म्हणजे एकूण नऊ वर्ष शिष्यवृत्ती बडोदा संस्थान कडून देण्यात आली होती. सयाजीरावांनी बाबासाहेबांना दिलेली शिष्यवृत्ती व त्याच्या मोबदल्याच्या स्वरूपात समाजोद्धाराची परतफेड या दोन्ही गोष्टी पूर्णतः यशस्वी झाल्याच्या दिसतात.

**प्रास्ताविक**

पिढ्यापिढ्यांनी ज्या समाजाला जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवले होते, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाने केले. अन्न, वस्त्र व निवारा या मानवी जीवनाच्या मूलभूत गरजांसोबत शिक्षण व आरोग्य या दोन गरजाही मूलभूत असल्याचे आपल्याला आता दिसत असले तरी, समाजातील शोषित व दुर्लक्षित घटकाच्या उत्थानाचे कार्य स्वीकारलेल्या बाबासाहेबांना शिक्षणाचे महत्त्व पूर्वीच ज्ञात होते. शिक्षणाने आपण आपल्या समाजाचा उद्धार करू शकतो, परंतु हे शिक्षण घेत असताना बाबासाहेबांना अनेक वेळा आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला होता. तत्कालीन काळात अस्तित्वात असलेल्या समाजाच्या उतरंडीमध्ये सगळ्यात खालच्या स्तरावर असणाऱ्या जातींची आर्थिक - सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय होती, बाबासाहेबांची परिस्थिती काही वेगळी नव्हती. बाबासाहेब दोन-तीन वर्षाचे असताना त्यांचे वडील रामजी सपकाळ लष्करी सेवेतून निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतर पन्नास रुपये पेन्शन त्यांना सुरू झाली होती. १९०९ साली बाबासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले होते.

**बडोद्यातील शिष्यवृत्ती**

मॅट्रिकच्या परीक्षेत मिळालेल्या यशामुळे मुंबईतील डबकाचाळीतील लोकांनी बाबासाहेबांचा सत्कार केला होता. या सत्काराला सिताराम केशव बोले यांच्या अध्यक्षतेखाली व भीमरावांच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक कृष्णाजी केळुस्कर यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी केळूस्करांना भिमरायांच्या शिक्षणात असणारी आर्थिक अडचण लक्षात आली व ती अडचण दूर करण्यासाठी केळूस्करांचे स्नेही इंदूप्रकाशचे मालक द. सा. यंदे यांच्या सहकार्याने श्रीमंत महाराज सयाजीराव महाराजांची भीमराव यांना भेट करून देण्याचे आश्वासन दिले.[१] दरम्यानच्या काळात महाराज मुंबईत आल्याने द. सा. यंदे यांनी महाराज व बाबासाहेब यांची भेट घालून दिली. या भेटीदरम्यान तत्कालीन काळात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीत शिक्षणाची असलेली दुरावस्था दूर करण्याचे कार्य हाती घेऊन बडोदयातही अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाच्या प्रसार कार्यात हातभार लावण्याचे अटीवर सयाजीराव महाराजांनी बाबासाहेबांना कॉलेज शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. दरमहा २५ रुपये शिष्यवृत्ती ही एल्फिन्स्टनकॉलेज, मुंबई येथे बीए करण्यासाठी दिली होती. जानेवारी १९९३ ला बाबासाहेब बीए ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

**बडोद्यातील नोकरी**

बीए पास झाल्यानंतर वडिलांच्या विरोधात बाबासाहेबांनी दिलेल्या वचनाला जागुन बडोद्यात नोकरीस जाण्याचे ठरविले. आपले विस्तारित कुटुंब सोडून भीमराव २३ जानेवारी १९१३ रोजी बडोद्यात पोहोचले तिथे भीमरावांना आर्य समाजाचे पंडित आत्माराम यांची मदत झाली. परंतु कामाच्या ठिकाणी त्यांना चांगली वागणूक मिळाली नाही. उच्चवर्णीय व बहुजनांची माणसं माघारी म्हणत महाराजांनी एक महार आमच्या डोक्यावर आणून बसविला.[२] पुढे भीमरावांना बडोद्याच्या सैन्य विभागात लेफ्टनंट म्हणून आदेश निघाले त्यांची राहण्याची सोय समाजाच्या कार्यालयात होती व जेवणाची सोय समाजाचे शिक्षक देशमुख यांच्याकडे होती.

बडोद्यास येतानाच भीमरावांच्या वडिलांनी त्यांना विरोध केला होता, आणि त्याच तणावाने त्यांच्या वडिलांची तब्येत खालावली होती. वडील आजारी असल्याच्या तारेने भीमराव लगोलग मुंबईस निघाले. २ फेब्रुवारी, १९१३ या दिवशी त्यांच्या वडिलांची प्राणज्योत मालवली. भीमरावांवर आलेल्या कौटुंबिक संकटाने बडोद्यास परतण्यास वेळ लागेल हे भीमरावांनी बडोद्यास कळवले होते.

**विदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

बाबासाहेबांवर झालेल्या कौटुंबिक संकटांनी अस्थिरतेचे वातावरण तयार झाले होते. याच अस्थिरतेच्या वातावरणात असताना सयाजीराव महाराज मुंबईत आल्याचे वृत्त बाबासाहेबांना मिळाले. मनाचा निश्चय करून बाबासाहेब मलबार हिल वरील जय महालात महाराजांना भेटावयास गेले. जाताना भीमरावांनी बडोद्यातील नोकरीच्या ठिकाणी आलेल्या अडचणींचा असलेला अर्ज सोबतीस ठेवला होता. भेटीदरम्यान ख्याली खुशालीच्या गप्पा नंतर त्यांनी महाराजांना त्यांच्या अडचणीचे निवेदन तोंडी सांगितले, व सोबतीस असलेला अर्ज महाराजांना दिला. भीमरावांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व अर्जावरील इंग्रजी हस्ताक्षर पाहून महाराज' खुष झाले. आपण दिलेली शिष्यवृत्ती कामी आली त्याचे त्यांना समाधानही झाले.[३] महाराज व बाबासाहेब यांच्या या भेटीच्या वेळी जरी बाबासाहेब त्यांच्या कामाच्या ठिकाणची गैरसोय व अनिश्चित काम याबाबतीत कथन करत असताना महाराज तो विषय सोडून इतर बाबतीत चर्चा करत होते. इतर बाबीवर झालेली चर्चा व त्यातील बाबासाहेब यांची मतं यांनी सयाजीराव महाराज खूपच प्रभावित झाले, आणि त्यांना उद्या येण्याची सूचना देऊन निरोप घेतला. या निरोपाने मात्र डॉ. बाबासाहेब यांचे मन अगदीच उद्विग्न झाले, व रात्रभराच्या चिंतेनंतर दुसऱ्या दिवशी झालेली महाराजांची भेट म्हणजे बाबासाहेबांच्या शैक्षणिक कारकिर्दीची एक नवी सुरुवात ठरली. या भेटीत सयाजीरावांनी बाबासाहेबांना आवड असणाऱ्या म्हणजेच समाजशास्त्र, अर्थशास्त्र व पब्लिक फायनान्स या विषयाच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवण्याचा विचार बोलून दाखवला. पण या विषयांच्या अभ्यासाचा उपयोग करून आपल्या समाजाची अवस्था दूर करण्याचा निश्चय सयाजीराव महाराजांना बोलून दाखवला, हेच कार्य करावे अशी अपेक्षा असल्याने महाराजांनीही शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची सुचवले.

४ एप्रिल १९१३ रोजी बाबासाहेबांची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. जुलै १९१३ ला बाबासाहेबानीं कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला.[४] कोलंबिया विद्यापीठात बाबासाहेबांचा अर्थशास्त्र हा मुख्य विषय होता. समाजशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान व मानववंशशास्त्र हे दुय्यम विषय होते. १९१५ मध्ये प्राचीन भारतातील व्यापार (ancient Indian commerce) या विषयावर प्रबंध लिहून बाबासाहेबांनी एमए पदवी संपन्न केली. अर्थशास्त्रात 'भारताचा राष्ट्रीय नफा: एक ऐतिहासिक पृथ्वकरणात्मक परिशीलन' (National dividend of India: a historic and analytical study) या विषयावर संशोधन करून १९१६. ला कोलंबिया विद्यापीठाला तो पीएचडीचा प्रबंध म्हणून सादर केला. विद्यापीठाने तो स्वीकारला. हा प्रबंध आठ वर्षांनी लंडनच्या पी. एस. किंग अँड सन्स या प्रकाशनाने The evolution of provincial finance in British India या नावाने प्रकाशित केला. भीमराव आंबेडकरांनी हा ग्रंथ कृतज्ञतेने श्रीमंत सयाजीराव महाराज यांना अर्पण केला. संबंधित ग्रंथाची प्रत सयाजीरावांनी बघितल्यानंतर खूप समाधान व्यक्त केले, एम ए पदवी घेतल्यानंतर बाबासाहेबांना लंडनच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या नामांकित संस्थेत अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घ्यावे असे वाटत असताना त्यांच्या शिष्यवृत्तीचे केवळ एकच वर्ष बाकी असल्याची जाणीवही त्यांना होती. परंतु बडोदा सरकारशी केलेल्या करारातील एक महत्त्वपूर्ण अट अशी होती की, मूळ कागदपत्रात उल्लेखित अभ्यासक्रमाशिवाय इतर विषयाचा अभ्यास करता येणार नाही. करायचे ठरल्यास संस्थानची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल, पण असे न करता भीमराव परस्पर लंडनला आले.

ऑक्टोबर १९१६ मध्ये वर उल्लेखित नामांकित संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर लंडनच्या विद्यापीठात अर्थशास्त्र या विषयांतर्गत अभ्यास सुरू केल्याचे प्राध्यापकांच्या शिफारशीसहित अर्ज बडोदा संस्थान कडे परवानगी करिता भीमरावांनी केला. संबंधित आशयाचे अर्ज दोन वेळा करून हे विद्याधिकारी व दिवानांनी नियमावर बोट ठेवून प्रकरण सयाजीराव महाराजांकडे नेले असता महाराजांनी पुन्हा एक वर्ष शिष्यवृत्ती वाढवून दिली. विद्यार्जनात व्यस्त असलेल्या बाबासाहेबांनी डॉक्टर ऑफ सायन्स (D.Sc.) सोबत बॅरिस्टर पदवीसाठीही प्रवेश घेऊन दोन्ही विषयांचा अभ्यास सुरू केला. एका वर्षानंतर पुन्हा पाचव्यांदा शिष्यवृत्ती मिळावी यासाठी बाबासाहेबांनी विनंती केली. यावेळी दिवानांनी पदवीसाठी चार वर्ष, एम ए साठी तीन वर्ष , पदव्युत्तर वाढवून एक वर्ष, पुन्हा एक वर्ष अशा चार वेळेस म्हणजेच एकूण नऊ वर्ष शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. बाबासाहेबांना एकूण तीन पदव्या देखील मिळाल्या आहेत. एकंदरच आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिले महायुद्ध सुरू झाले आहे, तरी बाबासाहेबांनी आता भारतात परतावे

आणि बडोद्यात नोकरी करावी असा शेरा बाबासाहेबांच्या अर्जावर लिहिण्यात आला. मुदतीनंतर दोन वेळा शिष्यवृत्ती वाढवून स्वतः सयाजीरावांनी सरकारचे नियम मोडले होते. त्यामुळे आता नियम मोडणे हे दिवानांना व विद्याअधिका-यांना रुचणारे नव्हते, त्यामुळे बाबासाहेबांना २१ ऑगस्ट १९१७ ला मुंबईत परत यावे लागले.

**संदर्भसूची:-**

१). बाबा भांड, सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१६, पान नंबर २२.

२). खैरमोडे चांगदेव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-एक, सुगावा प्रकाशन, पुणे, १९५२, पान नंबर ७१-७२.

३). बाबा भांड, महाराजा सयाजीराव आणि बाबासाहेब आंबेडकर, महाराज सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद ,२०२१ पान नंबर ७०.

४). मगर राजेंद्र, दानशूर महाराजा सयाजीराव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२२, पान नंबर ७२.

५) पाटील दिनेश, महाराजा सयाजीराव कृतीशील सत्यशोधक, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.